१५

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष २, अंक १०८] मंगळवार, डिसेंबर ६, २०१६/अग्रहायण १५, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १६०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

अल्पसंख्याक विकास विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक ६ डिसेंबर, २०१६.

**वक्फ अधिनियम, १९९५.—**

क्र. वक्फ २००९-प्र.क्र.१०५-कार्यासन-४.—

वक्फ अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३) च्या कलम ४ मधील तरतुदींअन्वये प्रदान करण्यात आलेल्या व या संदर्भात प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून तसेच, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. वक्फ २००९-प्र.क्र.१०५-कार्यासन-४, दिनांक २० ऑक्टोबर, २०१० अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन याद्वारे अशा औकाफ, वक्फ संस्था आणि वक्फ मालमत्ता—

(१) ज्या महाराष्ट्र राज्यात दिनांक १ जानेवारी, १९९६ रोजी अस्तित्वात होत्या तथापि यापुर्वीच्या सर्व्हेक्षणामध्ये त्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता ; आणि

(२) ज्या दिनांक १ जानेवारी, १९९६ नंतर अस्तित्वात आलेल्या आहेत आणि / किंवा ज्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात आहेत.

यांचे सर्व्हेक्षण करण्याकरिता—

(१) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची औकाफ चे सर्व्हेक्षण आयुक्त म्हणून ;

(२) राज्यातील सर्व जिल्ह्यांचे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची त्यांच्या संबंधित जिल्ह्यासाठी औकाफ चे अतिरिक्त सर्व्हेक्षण आयुक्त म्हणून ; आणि

(३) राज्यातील सर्व तालुक्यांचे तहसिलदार यांची त्यांच्या संबंधित तालुक्यासाठी औकाफ चे सहायक सर्व्हेक्षण आयुक्त म्हणून , नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्याम तागडे,
प्रधान सचिव.

२५. महसूल व वन विभाग (का-ज-१), मंत्रालय, मुंबई,
२६. वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई,
२७. सर्व अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२८. सर्व कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२९. निवड नस्ती,
३०. कार्यासन-४, संग्रहार्थ.